# उपनिबंधक,सहकारी संस्था आर दक्षिण विभाग मुंबई यांचे कार्यालय

३०३,ओ विंग, ३ रा मजला,बी एम सी गोडाउन इमारत,संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ,ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) आदेश

जा.क्र.मुंबई उपनि/आर दक्षिण विभाग/ १३७१/२०१८.

दिनांक ०४/०५/२०१८.

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद.
२. मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील दिनांक १९.०५.२०१५ रोजीचे परिपत्र.
३. संस्थेकडील दिनांक ०६.०१.२०१७, २०.०९.२०१७ व ०३.११.२०१७ रोजीचे पत्र
४. या कार्यालयाकडील दिनांक १३.१०.२०१७ व १३.११.२०१७ रोजीचे पत्र.
५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) दिनांक २३.११.२०१७ रोजीची सुनावणी नोटीस.
६. संस्थेकडील दिनांक ०३.१२.२०१७, ०६.०२.२०१८ रोजीचा खुलासा.

ज्याअर्थी, वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि., ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१ संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली असून तिचा नोंदणी क्र. एमयुएम /डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/१२०२३/२००३-२००४ दिनांक २१.०५.२००३ असा आहे. आणि,

ज्याअर्थी वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि., ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१ (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या ११ जागांसाठी निवडणूक दिनांक ०५.०७.२०१५ रोजी झालेली असून सदर निवडणूकीमध्ये सर्व साधारण गटातून ६ व महिला मतदार संघातून २ असे एकूण ८ जागा निवडून आलेल्या असून उर्वरीत ३ जागा रिक्त असल्याचे दिनांक ०३.११.२०१७ च्या पत्रा वरुन निदर्शनास येत आहे. तसेच सदर पत्रावरुन सर्व साधारण गटातून २ समिती सदस्यांनी तसेच महिला गटातून १ समिती सदस्यांनी पदाचे राजीनामे सादर केले असल्याबाबत या कार्यालयास अवगत केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, व्यवस्थापक समितीतील रिक्त झालेल्या जागा को ऑप करणेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत दिनांक २०.०९.२०१७ या कार्यालयास अवगत केलेले असून त्याबाबत आपणास सविस्तर माहिती दिनांक १३.१०.२०१७ च्या पत्राने खालील प्रमाणे अवगत करण्यात आलेली होती. आणि,

संस्थेच्या संचालक मंडळातील रिक्त जागा भरणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४ मध्ये नैमित्तीक रिक्त पदे कोणती आहेत या बाबत स्पष्ट तरतुद आहे ते खालील प्रमाणे

१. मृत्यूमुळे रिक्त होणारी जागा
५. राजीनाम्यामुळे रिक्त होणारी जागा
२. अपात्रता अथस निष्कासनामुळे रिक्त होणारी जागा
३. समिती सदस्याच्या कामकाज करण्यास असमर्थ होण्यामुळे रिक्त झालेली जागा

वर नमुद कारणामुळे रिक्त होणा-या जागा हया नैमित्तीक रिक्त जागा असून सदर जागा भरणेबाबत अधिनियम व नियमात संदिग्धता आहे. त्यामुळे सदयस्थितीत सदर जागा भरण्यांची कार्यवाही स्थगित असल्याबाबतचे स्पष्टीकरण मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिनांक १९.०९.२०१५ रोजीचे परिपत्रकान्वये केलेले आहे

वर नमुद कारणा व्यतिरिक्त निवडणूकीदरम्यान एकूण ससिमती सदस्य संख्येच्या २/३ पेक्षा अधिक जागा निवडून आल्यानंतर व समितीचे गठण झाल्यानंतर पात्र उमेदवार उपलब्ध न होणे व निवडणूक प्रक्रियेमध्ये उमेदवारांनी अर्ज मागे घेणे या कारणामुळे ज्या जागा निवडणूक न होता रिक्त राहतात त्या जागा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (५) मधील तरतुदीनुसार निवडणूकीद्वारे भरणे अनिवार्य आहे.

ज्याअर्थी, व्यवस्थापक समितीमध्ये एकुण ११ समिती सदस्यापैकी ३ समिती सदस्यांनी पदाचा राजीनामा सादर केलेला आहे. तसेच सर्वसाधारण निवडणूकीमध्ये ३ जागा रिक्त राहीलेल्या आहेत. त्यामुळे व्यवस्थापक समिती सदस्यांची संख्या ५ शिल्लक राहत असल्यामुळे सुधारीत उपविधी क्र ११४ मधील तरतुदीनुसार गणपुर्ती पुर्ण होत नसल्याचे तसेच संस्थेच्या व्यवस्थापना मध्ये पोकळी निर्माण झालेली आहे असे या कार्यालयाच्या निदर्शनास येत आहे. आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये पोकळी निर्माण झालेली असल्यामुळे व्यवस्थापक समितीची गणपुर्ती (Quoram) पुर्ण होत नाही. संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नसल्यामुळे संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करून प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे आणि,

ज्याअर्थी, वर नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता आणि सदर राजीनाम्यामुळे, को ऑप मुळे तसेच रिक्त जागेमुळे व्यवस्थापक समितीची गणपुर्ती (Quoram) पुर्ण होत नसून संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे. तसेच राजीनाम्यामुळे/रिक्त जागेमुळे संस्थेच्या समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे किंवा समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली आहे. सबब संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी/प्राधिकृत अधिकारी मंडळ का नियुक्त करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेसाठी संदर्भ क्र ५ अन्वये सुनावणी निर्गमित करण्यात आलेली होती. आणि,

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने या कार्यालयात दिनांक १२.१२.२०१७, १९.१२.२०१७, ०९.०१.२०१८, २२.०१.२०१८, ०६.०२.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सदर सुनावणीस संस्थेचे ॲड मृणाल दळवी, श्री वाघ-सचिव तसेच इतर समिती सदस्य हे उपस्थित असून नस्ती निर्णयार्थ बंद करण्यात आले. आणि,

**संस्थेचे ॲड मृणाल दळवी, श्री वाघ-सचिव तसेच इतर समिती सदस्य यांनी उपस्थित राहून खालील प्रमाणे म्हणणे सादर केले.**

१. व्यवस्थापक समिती मध्ये एकुण ८ जागा निवडणूक आल्या असून माहे नोव्हेंबर/ डिसेंबरमध्ये ३ रिक्त जागा निर्माण झालेल्या आहेत.
२. डिसेंबर २०१७ मध्ये रिक्त झालेल्या जागा को ऑप केलेल्या असल्यामुळे व्यवस्थापक समितीमध्ये सध्या ०६ समिती सदस्य कार्यरत असल्यामुळे व्यवस्थापक समितीची गणपुर्ती पुर्ण होत आहे.
३. संस्थेच्या व्यवस्थापक समितीमध्ये रिक्त झालेल्या जागाबाबत वेळोवेळी निबंधक कार्यालयास अवगत केलेले असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (४) नुसार नैमित्तिक रिक्त पद, ज्याच्यासंबंधात नैमित्तिक रिक्त पद निर्माण झाले असेलअशा क्रियाशील सदस्यांच्या त्याच वर्गामधून भरता येईल अशी तरतुद असल्यामुळे दिनांक १९.०९.२०१५ चे परीपत्रक लागू होत नाही.
४. व्यवस्थापक समितीचा आर्ध्यापेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असल्यामुळे आर्टीकल २४३ झेड जे व २४३ झेड के नुसार व्यवस्थापक समितीस नैमित्तिक रिक्त जागा भरता येतात.

**अभिप्राय :**

संस्थेने दाखल केलेले वर नमुद मुद्दे विचारात घेतले असता , व्यवस्थापक समितीमध्ये गणपुर्तीसाठी आवश्यक असलेले ०६ समिती सदस्य कार्यरत असल्याचे तोंडी सांगितले असले तरी याबाबतचे कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत. तसेच संस्थेच्या व्यवस्थापनेमध्ये रिक्त झालेल्या जागा भरणेबाबत मार्गदर्शन मागितले असले तरी याबाबत मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी निर्गमित केलेल्या दिनांक १९.०९.२०१५ च्या परीपत्रकातील मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घेऊन संस्थेस त्या त्या वेळी अवगत करण्यात आलेले आहे. संस्थेने दिनांक ०३.११.२०१७ रोजी सादर केलेल्या पत्रानुसार संस्थेची निवडणूक दिनांक ०५.०७.२०१५ रोजी झालेली असून सर्व साधारण गटात ०६ व महिला मतदार संघात ०२ उमेदवार निवडून आलले होते निवडून आलेल्या समिती सदस्यापैकी सर्वसाधारण गटातून ०२ व महिला मतदार संघातून ०१ समिती सदस्यांनी पदाचे राजीनामे दिले असल्यामुळे सध्या व्यवस्थापक समितीमध्ये ०५ समिती सदस्य कार्यरत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे. सबब सुधारीत उपविधी क्र. ११४ मधील तरतुदीनुसार व्यवस्थापक समितीची गणपुर्ती होत नसल्यामुळे , पोकळी निर्माण झालेली असल्याचे या कार्यालयाचे स्पष्ट मत असल्यामुळे अशा समितीला पुढील काळासाठी काम करण्यांचा अधिकार प्राप्त होत नाही आणि,

त्याअर्थी वर नमुद परिस्थती विचारात घेता संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत असल्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी व संस्थेवर त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेची आवश्यकता असल्याची माझी खात्री झालेली असल्यामुळे, मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(बी) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डॉ. अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था,आर/दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि., ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१ या संस्थेच्या विदयमान व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करीत असून संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी श्री एम व्ही राणे, प्रमाणीत लेखापरीक्षक याची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे. प्राधिकृत

Scanned by CamScanner

अधिकारी यांनी संस्थेचे दैनंदिन कामकाज करीत असताना प्रतिमहा मानधन रुपये ५०००/- अधिक प्रवास खर्च संस्थेच्या एकत्रीत निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा आदेश आज दि. ०४/ ०५/२०१८ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

(डॉ.अविनाश भागवत),
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

**प्रत,**

श्री एम व्ही राणे, प्रमाणीत लेखापरीक्षक,
मो. नं. ९८६९२५०७४९,
यांना कळविण्यात येते की, संस्थेच्या माजी पदाधिकारी यांचे
अवगत करावा.

**प्रति,**

१.अध्यक्ष / सचिव/खजीनदार,
वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि.,
ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

२. चेअरमन,
वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि.,
ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

३. सचिव- शरद एस वाघ,
वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि.,
ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

४. खजिनदार,
वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि.,
ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

५. समिती सदस्य.
वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि.,
ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

६. समिती सदस्य.
वसंत सागर गंगा को.ऑप.हौ.सो.लि.,
ठाकूर व्हिलेज, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

२/- यांना कळविणेत येते की, संस्थेच्या सपुर्ण दप्तराचा ताबा निवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करुन तस अहवाल सादर करावा तसेच सदर नियुक्तीच्या आदेशापासून संस्था पदाधिकारी यांच्या कोणताही आर्थिक बाबी संदर्भात बँक व्यवहा करण्यात येऊ नये. अन्यथा याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सबंधितांची राहील याची कृपया गंभीर नोंद घ्यावी.

०७) मा.अध्यक्ष/सचिव, व्यवस्थापक, मुंबई जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्थाचा संघ,विकास प्रिमायसेस ,फोर्ट मुंबई- ०१

०८) चेअरमन/व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.,/ दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कांदीवली

**२/- यांना कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या खात्यावरील विदड्रावलचे व्यवहार नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच मान्यतेशिवाय करण्यात येऊ नये.**

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>**

१.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई
२.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई
३. निवड नस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

भारतीय डाक
India Post
EM1055370711N IVR:69771055370
SP BORIVALI WEST SO <400092>
Counter No:5.19/05/2018.08:39
To:CHAIRMAN VASA.THAKUR VILLAGE
PIN:400101. Kandivali East SO
From:LIPIK UPNIB.306 A WING BMC G
Wt:20gms
Amt:0.00SS:20.00Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>

भारतीय डाक
India Post
EM1055369551N IVR:69771055369
SP BORIVALI WEST SO <400092>
Counter No:5.19/05/2018.08:39
To:ADHYAKSHA/SAC.VASANT SAGAR GAN
PIN:400101. Kandivali East SO
From:LIPIK UPNIB.306 A WING BMC G
Wt:20gms
Amt:0.00SS:20.00Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>

Scanned by CamScanner